आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२० जून २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर
- आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त देशोदेशी कार्यक्रमांचं आयोजन
- यूजीसी-नेट जून २०२४ परीक्षा रद्द
- टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज भारताची लढत अफगाणिस्तान बरोबर
- तमिळनाडूमध्ये कल्लाकुरिची इथं भेसळीची दारू प्यायल्यामुळे किमान ३३ मजुरांचा मृत्यू झाला, तर ६० पेक्षा अधिक मजुरांवर उपचार सुरु

**आणि**

- महाराष्ट्रात पालघर जिल्ह्याला उद्यासाठी पावसाचा रेड अलर्ट

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते ८४ विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन करणार असून श्रीनगरमध्ये उद्या होणाऱ्या `युवकांचं सक्षमीकरण, जम्मू-काश्मीरमध्ये बदल` या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. सरकारी सेवेत प्रवेश करणाऱ्या दोन हजार उमेदवारांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नियुक्त्यांची पत्रं वितरित करण्यात येतील. तसंच उद्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात ते सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात सुमारे ७ हजार नागरिक सहभागी होण्याची शक्यता आहे.

प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जम्मू काश्मीर मधे सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त देशोदेशी कार्यक्रम होत आहेत. बांगलादेशात भारतीय राजदूतावासानं ढाका येथील मिरपूर इनडोअर स्टेडिअममध्ये उद्या योग दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन केलं असून या कार्यक्रमात बांगलादेशची योग संघटना सहभागी होणार आहे. बांगलादेशातले भारतीय राजदूत प्रणय वर्मा सर्वांचं स्वागत करणार आहेत.

नेपाळमधल्या भारतीय दूतावासानं काल पोखरा इथं फेवा तलावाच्या काठी योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं होतं. त्यात स्थानिक रहिवासी, स्थानिक प्रशासन यंत्रणांचे अधिकारी, भारतीय लष्करातील निवृत्त गोरखा जवान, तसंच दूतावासातले कर्मचारी  मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

उद्याच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतल्या भारतीय दूतावासानंही वॉशिंग्टन इथं योग दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात वाढवण इथं पर्यावरणपूरक बंदर विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी ७६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. या बंदराचं काम पूर्ण झाल्यानंतर जगातल्या आघाडीच्या दहा बंदरांमधे त्याची गणना होईल, असं ते म्हणाले. हे बंदर दोन टप्प्यांमध्ये विकसित करण्यात येईल आणि त्यात दोन कोटी तीस लाख वीस फूट लांबीची कंटेनर एककं म्हणजे टीईयू इतकी क्षमता असेल. या बंदरामुळे सुमारे वीस लाख रोजगारनिर्मिती होईल.

या वर्षाच्या खरीप हंगामासाठी चौदा पिकांच्या किमान आधारभूत किंमती वाढवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. भात, कापूस, भरड धान्यं, डाळी आणि तेलबियांच्या किमान आधारभूत किंमतींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात येणार आहे. देशभरात दोन लाख गोदामं उभारण्यावर सरकार काम करत आहे असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या वाढदिवसानिमित्त उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राष्ट्रपतींच्या निवासस्थानी भेट देत त्यांना निरोगी आणि आनंदी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती मुर्मू यांना समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपतींची देशाप्रती सेवा आणि त्याग आपल्यासाठी प्रेरणादायी असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

राष्ट्रपतींच्या वाढदिवसानिमित्त त्यांची विशेष मुलाखत आज सकाळी पावणे ९ वाजता आकाशवाणी गोल्डसह देशभरातल्या आकाशवाणी केंद्रांवरून प्रसारित करण्यात आली. माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी ही मुलाखत घेतली होती.

<><><><><>

सरकारनं यूजीसी-नेट जून २०२४ परीक्षा रद्द केली आहे. ही परीक्षा नव्यानं घेण्यात येणार असून, त्याबाबतची माहिती स्वतंत्रपणे कळवली जाणार आहे. भारतीय सायबर गुन्हे गुप्तवार्ता केंद्राकडून परीक्षा यंत्रणेत गैरप्रकारांच्या शक्यतेबाबत माहिती मिळाल्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या प्रकरणी सीबीआयकडे तपास सोपवण्यात आला आहे.

राष्ट्रीय परीक्षा संस्था म्हणजे एनटीएनं देशभरातल्या वेगवेगळ्या शहरांमध्ये गेल्या गुरुवारी दोन सत्रांमध्ये ही नेट परीक्षा घेतली होती.

नीट परीक्षेत झालेला गोंधळ ताजा असताना नेट परीक्षा रद्द करण्याचा प्रकार म्हणजे सरकारच्या अकार्यक्षमतेचा आणखी एक नमुनाच असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने दिली आहे. वर्षभर अतिशय प्रामाणिकपणे अभ्यास करून विद्यार्थी परीक्षा देत असतात आणि या परीक्षाच ग्राह्य धरल्या जात नसतील तर काय उपयोग असा सवाल प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी समाजमाध्यमावर उपस्थित केला आहे.

**<><><><><>**

यंदाच्या नीट अर्थात राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेशी निगडित उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित सर्व खटले सर्वोच्च न्यायालयाकडे हस्तांतरीत करण्याची मागणी करणाऱ्या राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं आज संबंधितांवर नोटीस बजावली. तसंच सर्वोच्च न्यायालयानं विविध उच्च न्यायालयांमध्ये सुरू असलेल्या नीट संदर्भातल्या सर्व कार्यवाहीला स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भट्टी यांच्या पीठानं हे निर्देश दिले. या सर्व याचिकांवरची सुनावणी येत्या ८ जुलैला होईल.

**<><><><><>**

अठराव्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल पाचव्या दिवशी मुंबईत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीच्या चित्रपटांचं परीक्षण केलेल्या परीक्षकांनी वार्ताहरांशी संवाद साधला. राष्ट्रीय स्पर्धेत अपूर्वा बक्षी यांच्या नेतृत्वातल्या पाच जणांच्या परीक्षक मंडळानं माहितीपट, ॲनिमेशन आणि शॉर्ट

फिक्शन अशा एकंदर ७७ चित्रपटांचं परीक्षण केलं. या मंडळात ॲना हेनकेल, ॲडेल सीलमन, डॉ. बॉबी सर्मा बरुआ आणि मुंजाल श्रॉफ यांचाही समावेश होता.

**<><><><><>**

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल दक्षिण आफ्रिकेनं अमेरिकेचा १८ धावांनी पराभव केला. या सुपर आठ गटातल्या ग्रुप दोनच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं १९५ धावांचं आव्हान अमेरिकेपुढे ठेवलं होतं. मात्र अमेरिकेचा संघ वीस षटकांमध्ये सहा गड्यांच्या बदल्यात १७६ धावाच करू शकला. आज सुपर एटमधील ग्रुप एकमध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता बार्बाडोसमधील ब्रिजटाऊनच्या केन्सिंग्टन ओव्हल इथं हा सामना सुरू होणार आहे.

**<><><><><>**

विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेच्या ३ ऱ्या सत्रात भारतीय महिलांच्या संयुक्त संघानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. ज्योती सुरेखा वेण्णम, परनित कौर आणि अदिती गोपीचंद स्वामी यांच्या संघानं उपांत्यपूर्व सामन्यात टर्की संघाचा २३४ - २२७ अशा गुणफरकानं  पराभव केला. भारतीय संघाचा अंतिम सामना इस्टोनिया बरोबर या शनिवारी होणार आहे.

**<><><><><>**

तमिळनाडूमध्ये कल्लाकुरिची इथं भेसळीची दारू प्यायल्यामुळे किमान ३३ मजुरांचा मृत्यू झाला, तर ६० पेक्षा अधिक मजुरांवर उपचार सुरु आहेत. बहुतांश बाधितांनी पोटदुखी, डोळ्यांत जळजळ, चक्कर येणं असे त्रास झाल्याची तक्रार केली होती. दहा जणांना पुढच्या उपचारासाठी पुदुच्चेरीच्या जवाहरलाल पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख तर उपचार घेत असलेल्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य राज्यसरकारने जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी या प्रकाराबद्दल तीव्र शोक प्रकट केला असून आज मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या प्रकरणी चौकशी आयोग स्थापन करण्यात आला असून बाधितांना हरप्रकारे मदत पोहोचवण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

या प्रकरणी दारुची तस्करी करणाऱ्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून २०० लिटर दारु जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात निष्काळजीपणा केल्याबद्दल जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांची बदली करण्यात आली आहे.

**<><><><><>**

दिल्ली आणि आसपासच्या परिसरात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची आणि धुळीचं वादळ येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. लोनीच्या ग्रामीण भागात, वायुदलाचा हिंडन तळ, बहादुरगड, गाजियाबाद, इंदिरापुरम या भागात पावसाची शक्यता असून हरियाणाच्या वल्लभगढ, सोनीपत, खरखोडा, मत्तलहेल तर उत्तर प्रदेशातल्या बागपत, मेरठ, सिंकदराबाद, बुलंद शहर मध्ये मध्यम पावसाची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्याही अनेक भागात आज सकाळपासून पावसाला सुरुवात झाली असून पालघर मध्ये काल रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. पावसामुळं पालघर जिल्ह्यातल्या सुर्या, वैतरणा, देहर्जा नद्या ओसंडून वाहात असून प्रशासनानं नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रात रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना पावसाचा यलो अर्लट जारी करण्यात आला आहे.

हवामान विभागानं केरळमध्ये अतिवृष्टीचा इशारा दिल्यानंतर एनडीआरएफच्या २१० जवानांच्या ७ तुकड्या तमिळनाडूतल्या अराक्कोण इथल्या तळावरुन केरळकडे निघाल्या आहेत.

//<><><><><>//